**Journal of Research and Development**
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-5(A)| May-2026

Original Article

# माणदेशाच्या सांस्कृतिक जडणघडणीत डॉ. कृष्णा इंगोले यांच्या साहित्याचे योगदान

**प्रा. डॉ. सुवर्णा गुंड[1] कु. यादव नयना नारायण[2]**
[1]मार्गदर्शक, मराठी विभागप्रमुख, माऊली महाविद्यालय वडाळा, ता.उ.सोलापूर,जि.सोलापूर
[2]संशोधक विद्यार्थी, मराठी विभागप्रमुख, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर
मु. पो. खंडाळी, ता. माळशिरस
**ईमेल-** pataleavinash5@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180509
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 5(A)
Pp. 38-41
May- 2026
**Submitted:** 15 Apr. 2026
**Revised:** 25 Apr. 2026
**Accepted:** 10 May. 2026
**Published:** 31 May 2026

***सारांश: -***

*मानवी जीवनात सांस्कृतीला विशेष महत्त्व आहे. प्रत्येक समाजाची, व्यक्तीची स्वतःची जशी संस्कृती असते. तशी एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण प्रदेशाची देखील असते. त्या प्रदेशाची संस्कृती तेथील लोकांची जीवनपध्दती, पेहराव, खाद्यपदार्थ, व्यवहार, नीती, कायदे, कला, साहित्य इ. अनेक गोष्टीतून अभिव्यक्त होत असते. संस्कृती आणि साहित्य यांचा थेट संबंध असून ते दोन्ही एकमेकांशी सरेखित आहेतमाणदेशामध्ये वैचारिक, सांस्कृतिक जाणिवा जाणीवपूर्वक निर्माण करणारे डॉ. कृष्णा इंगोले हे माणदेशी साहित्य प्रांतातील एक मान्यवर लेखक. त्यांनी जे विविधांगी साहित्य लेखन केले आहे. त्यातून माणदेशी संस्कृतीचे उमटणारे प्रतिबिंब, संवर्धन कसे घडले याचा शोध या शोध निबंधाद्वारे घेतला जाणार आहे. माणदेशी सांस्कृतिक जडणघडणीत त्यांची भूमिका व योगदान याचा वेध या शोधनिबंधाद्वारे घेण्यात येईल.*

## प्रस्तावना :-

महाराष्ट्राचा प्राकृतिक रचनेचा विचार केला तर कोकण, विदर्भ, मराठवाडा, खाणदेश असे विभाग आपल्या परिचयाचे आहेत. हे प्रदेश आपल्या भौगोलिक वेगळेपणातून आपली वैशिष्ट्ये, संस्कृती जोपासताना दिसतात. असाच एक वैशिष्ट्यपूर्ण उपेक्षित असलेला प्रदेश म्हणजे माणदेश. पश्चिम-दक्षिण महाराष्ट्रात सातारा, सांगली व सोलापूर या तीन जिल्ह्यांचा सीमारेषेवर माणदेश हा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रदेश आहे. माणदेश म्हणजे भाषा नदीच्या खोऱ्यातील प्रदेश होय. अथवा माणगंगा नदीच्या पाणलोट क्षेत्राचा प्रदेश म्हणजे माणदेश होय, असे डॉ. कृष्णा इंगोलो म्हणतात. नेहमी निसर्गाची अवकृपा असणारा, दुष्काळाचे वरदान लाभलेला हा माणदेश शिखर शिंगणापूरपासून जतच्या यल्लमा देवी पर्यंत तर शुक्राचार्यापासून पंढरीच्या विठोबापर्यंत पसरलेला आहे. खिलारी जनावरे, शेळ्या-मेंढ्या, दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष्य, मैलोनमैल पसरलेली उजाड माळराने, प्रतिकूल परिस्थितीतीला दोन हात करत चिवटपणे जगणारे संयमी लोक, कुटूंबाला जगविण्यासाठी करावे लागणारे तात्पुरते स्थलांतर, गोपालांचा प्रदेश, वैशिष्ट्यपूर्ण जाती-जमाती, शेतमजुरांची संख्या, लोकसाहित्य, माणदेशी बोली ही काही माणदेशाची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये आहेत. आणि ही वैशिष्ट्ये ज्या साहित्यात प्रतिबिंबित होतात त्याला माणदेशी साहित्य म्हणण्यास हरकत नाही. माणदेशाला समृध्द अशी साहित्य परंपरा आहे. साहित्य लेखनाबाबत येथे सुकाळ जाणवतो.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*प्रा. डॉ. सुवर्णा गुंड मार्गदर्शक, मराठी विभागप्रमुख, माऊली महाविद्यालय वडाळा, ता.उ.सोलापूर,जि.सोलापूर*

**How to cite this article:**
*गुंड, सुवर्णा., & यादव, नयना. नारायण. (2026). माणदेशाच्या सांस्कृतिक जडणघडणीत डॉ. कृष्णा इंगोले यांच्या साहित्याचे योगदान. Journal of research & development, 18(5(A)), 38–41. https://doi.org/10.5281/zenodo.20922207*

Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.20922207
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-5(A)| May-2026

माणदेशात अनेक साहित्यिकांनी आपल्या साहित्याद्वारे माणदेशी साहित्याला समृध्द केले आहे. माणदेशाला अनेक दिग्गज संत, कवी, साहित्यकांची परंपरा आहे. श्रीधर स्वामी नाजरेकरांपासून सुरू झालेली साहित्याची पंरपरा ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात, म. गो. पाठक, डॉ. भीमराव कुलकर्णी, उत्तम बंडू तुपे, प्रा. अरूण कांबळे शांताबाई शेळके, वामन जाधव, डॉ. सयाजीराजे मोकाशी इ. यांच्यापर्यंत आलेली आहे. याच माणदेशी साहित्यपरंपरेत आपल्या साहित्याद्वारे वेगळे ठसा उमटविणारे डॉ. कृष्णा इंगोले यांनी साहित्यनिर्मिती करून मौलाची भर घातलेली आहे. कथा, ललितलेखन, लोकसाहित्य, समीक्षा या क्षेत्रातील लेखनाबरोबर संशोधनपर साहित्यमध्येही मौलिक ग्रंथ निर्मिती केली आहे. अनेक माणदेशी साहित्यकांनी आपल्या साहित्यातून माणदेशी जीवन चित्रण केलेले आढळते. आपल्या लेखनीतून, कार्यातून माणदेशामध्ये वैचारिक, सांस्कृतिक जाणिवा निर्माण करण्याचे कार्य ते करत आहेत. माणदेश ही त्यांची जन्मभूमी, कर्मभूमी आहे. ज्या जन्मभूमीच्या जीवनरसावर आपला पिंड जोपासला आहे तो माणदेश म्हणजे नेमका कोणता भूभाग, तो आहे तरी कसा? याचा साकल्याने अभ्यास करून अखंड तीन वर्षाच्या अथक परिश्रमातून माणदेशः स्वरूप आणि समस्या हा संशोधनपर ग्रंथ लिहिला. डॉ. कृष्णा इंगोले यांच्या साहित्यातून माणदेशाची माणदेशाची संस्कृती कशी प्रतिबिंबित होते. त्याचे संवर्धन आपल्या साहित्याद्वारे कसे केले आहे. यासाठी त्यांच्या काही निवडक साहित्यकृती व संस्कृती यांचा शोध या शोधनिबंधाद्वारे घेणार आहोत

**गावरंग:-**

गावरंग हा डॉ. कृष्णा इंगोले यांचा कथासंग्रह 1996 साली प्रसिध्द झाला. पुरोगामी विचार व्यक्त करत वैचारिक परिवर्तन घडविणाऱ्या या कथा माणदेशी समाज मनाचे दर्शन घडवितात. माणदेशी ग्रामीण जीवन त्यांनी जवळून पाहिले असल्याने कथेतून साकार झाल्याचे दिसते. माणदेश, माणदेशी खेडे, माणदेशी माणूस आणि त्याच्या प्रवृत्तीसह गावाची वैशिष्ट्ये कथेतून आलेली पहायला मिळतात. वाकडी बाभळ या कथेच्या सुरूवातीलाच गावचं वर्णन आलेलं आहे. ते असे की, आमचं गाव चोपडी माणदेशातलं. इन मी दोनशे घराचा उंबरा. गाव मराठ्यांचं भारी डांबरट" या वर्णनातून माणदेशी खेडे, तेथील वातावरण सहजपणे लक्षात येते. त्याप्रमाणे माणदेशातील शेती, पीके, ऋतूहंगामाचे वर्णन पाणी या कथेत आल्याचे जाणवते. बघता-बघता उन्हाळा मोडला. आभाळ ढगानं काळवंडलं, चारदोन पाऊस झाले..... तुकानं पहिल्या पावसावर चिबडाच्या रानात साळी टाकल्या. बाजरी, मटकी पेरली. यातून माणदेशी कृषीजीवनाचे चित्रण, रान, पेरणी पिकांचा हंगाम चित्रित झालेला पहायला मिळतो. कथा पाण्याच्या कथेतून माणदेशाला नेहमीच भेडसावणारा पाण्याचा प्रश्न, पाण्याच्या शासकीय योजना गावातील भानगडी व पाण्याचे राजकारण, कोरड्या पडणाऱ्या नद्यांचे संदर्भ देऊन पाण्याचा प्रश्न वास्तवरूपाने मांडली आहे.

सोन्याधुळी सारखी कथा मानदेशी समूह मनाचे प्रतिनिधित्व करते. सोन्याधुळी हा गावकऱ्यांनी गैबीसाब या ग्रामदेवतेला सोडला जातो. त्यातून पुढे घडणारे कथानक ग्रामदेवतेवर असणारी श्रद्धा, त्यांची परंपरागत धारणा लक्षात घेता मानदेशी अडाणी भोळी माणसे कोणालाही डोळस विचार न करता अंधश्रद्धेच्या आहारी जातात, डॉक्टर कृष्णा इंगोले यांच्या कथांमधून खेड्यातील जत्रा-यात्रा, उरूस, ग्रामदेवता त्यांचे विधी-उत्सव यांचे वर्णन विस्ताराने येते. 'मरीआईचा फेरा' या कथेत गावात साथ येते, रोगाची लागण होते. यामध्ये जुनी माणसे त्यास मरीआईचा फेरा समजतात तर तरूण मंडळी गावातील घाणीमुळे लागण झाल्याचे सांगतात. आणि शेवटी या कथेत कृष्णा इंगोले यांनी दोन्ही बाजू समान ठेवत संकट निवारणाचा मार्ग सांगितला आहे. यावरील दोन्ही कथेतून मान देशी या गावाकडील लोकांच्या श्रद्धा-अंधश्रद्धा, परंपरा यांचे अचूक वर्णन केलेले आहे तर 'पोटगी' 'लगीन' सारख्या कथांमधून माणदेशी माणसांची मानसिकता प्रत्ययास येते. 'शेणातलं दान' या कथेतून ओसाड दुष्काळ असलेल्या मा णदेशी प्रदेशातील दलित माणसाचे जीवन, दुःख, दारिद्र्य लक्षात येते. 'वळचणीचे पाणी ओढ्याला गेलं' ही कथा मंगळवेढ्याच्या विठु महाराची आणि दामाजी पंथाची प्रसिद्ध कथा, यातून एक वेगळे ऐतिहासिक सत्य मांडत कथेची पुर्नमांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या कथांमधून माणदेशी बोलीची लकब प्रत्ययास येते. भाषेत वापरल्या जाणाऱ्या म्हणी वाक्यप्रचार दिसून येतात. माणदेशी बोलीची वैशिष्ट्ये लक्षात येतात, उदा. 'ही मेलेली मढी उकरून काढू नका', 'निरुपयोगी जुन्या परंपरा कशाला चालू करता' किंवा 'लय गाजावाजा करू नगं तुझी भावभावकी बी चांगली न्हाय'. 'गावरंग' मधील कथा माणदेशी मध्यमवर्गीय, गरीब समाजातील व्यक्तीचित्रणे, प्रश्न, समाजजीवन, निसर्ग, कृषीजीवन याचे चित्रण झाल्याचे पाहायला मिळते. याविषयी डॉ. मनोहर सुरवडे, डॉ. कृष्णा इंगोले यांच्या कथांविषयी म्हणतातु 'खेड्यातील अज्ञान अंधश्रद्धा, परंपरा, आधुनिकता या विचारांची सांगड घालून लोकजीवनाचा परिचय देखील करून देते'. डॉ. कृष्णा इंगोले यांच्या कथांमधून माणदेशी संस्कृतीचे दर्शन होतेच, परंतु तेथील समस्या, पाण्याचा प्रश्न, जीवनाविषयी त्या अंतर्मुख करायला लावतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-5(A)| May-2026

**माणदेश: स्वरूप आणि समस्या: -**

डॉ. कृष्णा इंगोले यांनी माणदेशाचा सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, भौगोलिक, आणि आर्थिक इतिहास सांगणारा संशोधन पर ग्रंथ लिहिला आहे माणदेशाविषयी इतकी विस्तृत आणि चिकित्सक मांडणी करणारा मराठीतील हा एकमेव ग्रंथ असावा. कोणत्याही व्यक्तीला आपण ज्या परिसरात राहतो, त्या प्रदेशाचा भूगोल, इतिहास, लोकसंस्कृती, साहित्यपरंपरा ज्ञात नसते. आणि जोपर्यंत भूगोल, इतिहास आपल्याला कळत नाही तोपर्यंत संस्कृती नीट समजत नाही, कारण तो प्रदेशच इतिहास आणि संस्कृतीला जीवनरस पुरवित असतो. याचे भान ठेवूनच या ग्रंथाची रचना झालेली दिसते माणदेशाचे भौगोलिक स्थान, इथला प्राचीन इतिहास, मंदिरे, राजवटी, सामाजिक, राजकीय आंदोलने, स्वतंत्र लढा, या भूमीवरील साधुसंत, लोककला, उपास्य देवता, व्यापार, अर्थव्यवस्था, कारखानदारी आणि आजचे वर्तमान काळातील माणदेशाला भेडसवणारे जाज्वंत प्रश्न त्यावरचे उपाय याविषयीचे अभ्यासपूर्ण समतोल वृत्ती ठेवून संशोधकभूमिकेतून हा ग्रंथ निर्माण झाला आहे. या ग्रंथरूपाने डॉ. कृष्णा इंगोले यांनी माणदेशाचा सांस्कृतिक दस्ताऐवज पुढील पिढीला देऊ केला आहे. जेणेकरून आजची तरुण पिढी आपल्या भूभागाविषयी आस्था वाटेल, अभिमान वाटेल. माणनदी खोऱ्याचा भूसांस्कृतिक अभ्यास करणारे ते पहिले संशोधक आहेत. महाराष्ट्राला फारसा परिचित नसणारा भूभागाचा त्यांनी या ग्रंथाद्वारे परिचय करून दिला आहे ते खऱ्या अर्थाने माणदेश या भूप्रदेशाचे जनकच ठरतात. डॉ. कृष्णा इंगोले यांच्या माणदेशः स्वरूप आणि समस्या या ग्रंथातून केवळ माणदेश संस्कृतीचे संचितच पाहायला मिळत नाही. तर शासनकर्त्याला, राजकीय नेत्यांना, यंत्रणेला, अभ्यासकांना हा अतिशय मौल्यवान असा संदर्भ ग्रंथ ठरत आहे. डॉ. कृष्णा इंगोले यांनी माणदेशी सांस्कृतिक जीवनात इथल्या भूप्रदेशाचे प्राकृतिक बीज कसे खोलवर रुजले आहे; इथल्या लोकांचे आचार विचार, आहार, पोशाख, शेती, सण-समारंभ, जत्रा-यात्रा, विधी यांचे सत्यनिष्ठ दर्शन घडविल्याचे दिसत आहे. या ग्रंथाविषयी डॉ. द. ता. भोसले म्हणतात, माणदेशातल्या मातीचे संस्कार थोडेफार माझ्यावर झालेले असूनही या ग्रंथातील प्राचीन आणि मध्ययुगीन काळातील माणदेशाचा इतिहास, माणदेशातील साधुसंत आणि स्वातंत्र्यलढ्यातील माणदेशाचा सहभाग याविषयीची बरीच माहिती नव्याने समजली या ग्रंथरूपाने नव्या पिढीला फारसे ज्ञान नसलेले माणदेशाचे सांस्कृतिक वेगळेपण परिचयाचे होणार आहे

**लोकसाहित्य: -**

लोकसाहित्य, लोकसंस्कृती हा डॉ. कृष्णा इंगोले यांच्या आस्थेचा विषय आहे. लोकसंस्कृतीतील स्त्रीरूपे. 'लोकवाणीतील अमृतधन' या ग्रंथाची निर्मिती त्यातूनच झाली आहे. माणदेशी लोक साहित्याला वैभवशाली परंपरा असल्याचे दिसते. कोणत्याही प्रदेशाची भौगोलिक वैशिष्ट्ये, संस्कृती, लोकसाहित्यातून प्रतिबिंबित होताना दिसतात. डॉ. कृष्ण इंगोले यांनी आपल्या साहित्यातून माणदेशी लोकजीवन लोकसंस्कृतीला अजरामर केले आहे. बालपणीच्या काळात आईच्या जात्यावरच्या ओव्या, स्त्रियांची गाणी, लोककथा, दंतकथा, जागरण गोंधळ, तमाशा, वासुदेवाची गाणी, धनगरी ओव्या, गजी-ढोल सारखे लोक नृत्य, होलाराचे वाजप या माणदेशी लोकसंस्कृतीतील अनेक गोष्टी अनुभवलेल्या पाहिलेल्या होत्या. त्यातून त्या मनावर संस्कारित होत्या. माणदेशामध्ये असंख्य स्त्रीगीतांचा साठा आहे. डॉ. कृष्णा इंगोले यांनी ही स्त्रीगीते अनेक माता-भगिनींकडून परिश्रमपूर्वक संकलित केली. सुमारे आठ वर्षे ही गीते संकलित केली आहेत. एक हजार पृष्टे होतील एवढे साहित्य एकत्र केले आहे. त्यातील निवडक ओवीगीते एकत्र करून त्यावर थोडे भाष्य करून ते लेखन सलग प्रसंगातून जोडून लेकीच्या जन्मापासून ते तिच्या अहेव मरणापर्यंतचा जीवन प्रवास रेखाटून 'लोकसंस्कृतीतील स्त्री रूपें हा ग्रंथ लिहिला आहे.

नियतकालिकातून लोकसाहित्य वर काही परीक्षणात्मक, काही विश्लेषणात्मक, तर काही संशोधनात्मक लेख लिहिलेले आहेत. ते लेखन एकत्र करून 'लोकवाणीतील अमृतधन' हा ग्रंथ कोरोनाच्या कालखंडात या ग्रंथाची निर्मिती केली आहे. नव्या अभ्यासकांसाठी संशोधक विद्यार्थ्यांसाठी यातून काही एक दिशा सूचित करण्याचे कार्य केले आहे. त्याचबरोबर माणदेशी साहित्य हा 2022 मध्ये लिहिलेल्या एका प्रकरणातून माणदेशी लोक साहित्य विषयी लेखन केले आहे. माणदेशी ग्रामीण स्त्रियांच्या भावअविष्कार झालेली गीते खास माणदेशी लोकसंगीत असलेले होलाराचे वाजप, धनगरांचे गजी नृत्य, लोककथा, आख्यायिका, दंतकथा, म्हणी, समजुती, माणदेशी बोली यांनी समृद्ध असलेला लोकसाहित्याचा अमूल्य ठेवा पुढच्या कित्येक पिढ्यांना उपयुक्त ठरणारे आहे. डॉ. कृष्णा इंगोले यांनी आपल्या लोकसाहित्य लेखनातून माणदेशी संस्कृती, लोकपरंपरा जीवनदान देण्याचे कार्य केले आहे. लोक साहित्याचा अभ्यासकांना ग्रामीण स्त्रीवादी अभ्यासकांना दिशा देणारे ठरणार आहे. माणदेशातल्या खिलारी बैलाविषयीचे कौतुक जात्यावरच्या ओवीतही येते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-5(A)| May-2026

शिवंच्या शेतांमधी। कुंद्यानं केली काशी ॥
माझ्या हावशा बंधुजीची। जोडी खिल्लारी माणदेशी ॥

थोडक्यात कृष्णा इंगोले यांचे लोकसाहित्य हे माणदेशी लोकजीवनाचा आणि लोकसंस्कृतीचा अविष्कार घडवताना दिसते. डॉ. इंगोले यांच्या ओवीगीतांमधून मंगळवेढा, दहिवडी, शिखर शिंगणापूर या परिसरातील सांस्कृतिक इतिहासाच्या अनेक खाणाखुणा सापडतात. लोकांच्या जगण्याच्या रितीपरंपरा, माणसांमधील परस्पर नातेसंबंध स्त्रीजीवनाच्या भाव संबंध मागील सांस्कृतिक संबंध उलगडताना पाहायला मिळते

**आस्थेची माणसं:-**

हा व्यक्तीचरित्रपर लेखांचा संग्रह असला तरी यातील व्यक्ती माणदेशी प्रांतातील असून कृष्णा इंगोले यांच्या आस्थेचा आहेत. जागतिक पातळीवरील अनेक महान लोकांची चरित्रे आपल्याला ज्ञात असतात, परंतु आपल्या परिसरातील कर्तुत्ववान माणसाची जीवनचरित्र आपल्याला नीट माहीत नसतात. मानदेशी समाजाच्या सर्व स्तरावरील व सर्व जातीधर्मातील असून यांना शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक परिस्थितीची पार्श्वभूमी आहे.

त्या व्यक्तींचाही माणदेशाच्या सांस्कृतिक जडणघडणीत योगदान आहे. अशा कर्तुत्ववान व्यक्तींचा परिचय पुढील माणदेशी पिढीसाठी बहुअनमोल आणि प्रेरणादायी ठरणार आहे. याचबरोबर कृष्णा इंगोले यांनी अनेक वृत्तपत्रांमधून नियतकालिके यामधून माणदेश, माणदेशी लोक साहित्य यावर लेखन केले आहे.

**समारोप: -**

डॉ. कृष्णा इंगोले यांचा माणदेश हा आस्थेचा विषय आहे. या माणदेशी मातीचे संस्कार त्यांच्यात झालेले आहेत. आपल्या जन्मभूमी. कर्मभूमी विषयी त्यांना आत्मीयता आहे आणि या आत्मीयते मधूनच त्यांच्या हातून जे साहित्य निर्मिती झाले आहे त्याला माणदेशाची झालर आहे. माणदेशी लोकपरंपरा, लोकसंस्कृती, इतिहास, भूगोल, लोकसाहित्य याचे जतन संगोपन आपल्या साहित्याद्वारे करण्याचे कार्य ते आजही करत आहेत, प्रस्तुत संशोधनाद्वारे डॉ. कृष्ण इंगोले यांचे निवडक साहित्य व माणदेशी संस्कृती यांचा सहसंबंध शोध घेण्यात आला आहे आजवर अनेक साहित्यकांनी आपल्या साहित्यातून आपल्या जन्मभूमीला साकारले आहे. परंतु डॉ. कृष्ण इंगोले यांचे साहित्य व सांस्कृतिक दृष्टिकोनातून निर्माण झाले आहे हे त्यांच्या साहित्याचे वेगळेपण आहे

**निष्कर्ष:-**

1. भूसंस्कृतिक दृष्टीने मान देशी प्रांताचा अभ्यास करून मानदेशी साक्त्यि निर्माण केलेले दिसते.
2. माणदेशी माणसांच्या समूह मनाचे दर्शन त्यांच्या साहित्यातून घडते.
3. माणदेशी संस्कृतीला आपल्या कथेतून संशोधनवर ग्रंथ लोकसाहित्यातून संवर्धित करण्याचे कार्य केले आहे
4. मानदेशी सांस्कृतिक जळभरणीत डॉ. कृष्णा इंगोले यांचे महत्त्वपूर्ण यो गदान आहे.
5. मानदेशी माती निसर्ग कृषी संस्कृती यांचे संस्कार त्यांच्यावर झालेले आहेत

**संदर्भ ग्रंथः -**

1) संपा. डॉ. अरूण शिंदे - कृष्णाक्षर (डॉ. कृष्णा इंगोले व्यक्ती आणि वाङमय) स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
2) डॉ. इंगोले कृष्णा - माणदेश : स्वरूप आणि विकास, शब्द-शिवार प्रकाशन, मंगळवेढा, सुधारित द्वितीय आवृत्ती 2023.
3) डॉ. इंगोले कृष्णा - लोकवाणीतील अमृतधन, कृष्णा संशोधन व विकास अकादमी, मंगळवेढा.
4) डॉ. इंगोले कृष्णा - माणदेशी साहित्य, शब्द शिवार प्रकाशन, मंगळवेढा.
5) डॉ. इंगोले कृष्णा - आस्थेची माणसं, कृष्णा संशोधन व विकास अकादमी, मंगळवेढा.